# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि संशोधन केंद्र, अचलपूर

E-mail - arsachalpur@gmail.com

दुरध्वनी क्र. ०७२२३/२२०११

दिनांक- ०२ / ०१ /२०२३

जा.क्र. कृसंके/अचल/प्रक्षेत्र / ०१ /२०२३

### निविदा सुचना

प्रति,

..................................

..................................

..................................

**विषय - कृषि संशोधन केंद्र, अचलपूर येथील प्रक्षेत्रावर जेसीबी च्या साहयाने खुरटया काटेरी वनस्पती, चर खोदणे इ. कामाकरिता प्रति तास दर कळविण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येतेकी, या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावरील पडीत जमीन (अंदाजे क्षेत्र ४.०० हे.)तसेच खुरटया काटेरी वनस्पती काढणे, चर खोदणे, नाली साफ करणे, पालव्या काढणे, माती टाकूण बांध बंदिस्ती करणे, बांध साफ करणे इ. कामे करण्याकरिता जेसीबीचे प्रति तास दर अटी व शर्तीच्या अधिन राहुन पुरविण्याचे करावे.

| अ.क्र. | कामाचा प्रकार | दर प्रतितास (जीएसटी व सर्वकरासह) |
|---|---|---|
| १ | कृषि संशोधन केंद्र, अचलपूर येथील प्रक्षेत्रावरील पडीत जमीन साफ करणे, (अंदाजे ४.०० हे. क्षेत्र) तसेच खुरटया काटेरी वनस्पती काढणे, चर खोदणे , बांध साफ करणे इ. कामे जेसीबी द्वारे करण्याकरिता जेसीबी यंत्राचे पति तास दर संपुर्ण करासह नमुद करावे.(अट क्र. ६ च्या अधीन राहुन अंदाजे कामाची किंमत २.५० लक्ष रुपयेपर्यंत) | |

टीप - काम कार्यालयीन वेळेत सकाळी ८ ते ५ या वेळेत करावे लागेल.

**दर पत्रक व कामाविषयी नियम, अटी व शर्ती -**

१. दरपत्रके मोहरबंद लिफाफयामध्ये दिनांक १०/०१/२०२३ पर्यंत (सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत) प्रभारी अधिकारी , कृषि संशोधन केंद्र, अचलपुर जि. अमरावती या पत्त्यावर कार्यालयात पाठविण्यात यावे.

२. लिफाफ्याच्या डाव्या बाजुस स्पष्ट अक्षरात 'जेसीबी चे दर पुरविण्याबाबत' असे नमुद करावे. निविदा कार्यालयीन वेळेतच स्विकारण्यात येतील.

३. काम सुरु करण्याअगोदर कामाकरिता वापरावयाच्या जेसीबी मशीनचे परिवहन नोंदणी प्रमाणपत्र दयावे लागेल.

४. निविदाधारकास स्वत:चा कॉन्ट्रॅक्टर रजिस्ट्रेशन क्रमांक महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभगाचे मान्यताप्राप्त कंत्राटदार म्हणुन नोंदणी केलेले पत्र सादर करावे.

५. अपघात, दुखापत, नैसर्गिक / इतर कुठल्याही प्रकारची घटना घडल्यास कार्यालय व कार्यालय प्रमुख जबाबदार राहणार नाही.

६. सदर कामाची अंदाजे किंमत देण्यात आल्याने काम करताना ते कमी किंवा संपुर्ण नमुद केलेले काम (निधिउपलब्धतेनुसार) करुन घेण्याचे अधिकार कार्यालय प्रमुख यांना राहतील.

७. कंत्राटदाराने आयकर विभगाचे नोंदणीपत्र सदर निवेदनासोबत सादर करावे व शासकिय करस्मातील दायित्व स्वत: भरावे लागेल.

८. देयक सादर करतांना जी.एस.टी संबंधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी व शर्तीची पूर्तताकरण्याची जबाबदारी ही पुरवठादाराची स्वत:ची असेल.

९. आपणास कामाचा आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत काम सुरु करावे लागेल अन्यथा सदर आदेश रद्दकरण्याचे सर्व अधिकार प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, अचलपूर यांच्याकडे राखून ठेवले आहे.

१०. क्रेडिट बिल दोन प्रतित सादर करावे.

११. निविदा मंजुर करण्याचे व रद्द करण्याचे सर्व अधिकार प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, अचलपूर यांच्याकडे राखून ठेवले आहे. निविदा मंजुर झाल्यास कंत्राटदारास स्वखर्चाने रु. १००/- च्या स्टॅम्प पेपेरवर करारनामा देणे आवश्यक आहे.

१२. मंजुर झालेले दर ३१ मार्च २०२३ पर्यंत राहतील. त्याच दराने काम करावे लागेल.

१३. निविदा उशीरा पोहचल्यास त्या निविदाचा विचार करण्यात येणार नाही.

१४. कोणतीही निविदा पूर्णपणे अंशत: स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रके नाकारणे यांचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समिती यांचे असतील.

१५. या दरप्रक्रियेत अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अचलपूर न्यायालयात चालेल.

१६. वरील संपुर्ण कामाकरिता लागणारे जेसीबी यंत्र व त्याकरिता लागणारा इंधन पुरवठा कंत्राटदारास स्वत: करावा लागेल या कार्यालयाकडुन कोणताही आगावू वित्तपुरवठा करण्यात येणार नाही. संपुर्ण काम समाधानकारक झाल्यानंतरच कामाचे उधारी देयक जी ए टी / व्हॅट क्रमांकासह शोधनाकरिता कार्यालयास सादर करावे लागेल नंतरच कार्यालयीन शोधन चेकद्वारे करण्यात येईल.

**प्रभारी अधिकारी,**
**कृषि संशोधन केंद्र, अचलपूर**